IMPACT FACTOR
5.?3(SJIF)

**UPA NATIONAL E-JOURNAL**
Interdisciplinary Peer-Reviewed Journal

ISSN
2455-4375

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 1997 ते 2021 मध्ये सादर झालेल्या मराठी विषयातील पीएच.डी. प्रबंधांचे उल्लेख विश्लेषण (अंशतः सादरीकरण) भाग 1

**शिंदे साईनाथ भानुदास**
संशोधक,
माध्यमशास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड.

**डॉ. पवार गणपत रामसिंग**
ग्रंथपाल,
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**सारांश (abstract).**

*स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात 1997 ते 2021 मध्ये सादर झालेल्या मराठी विषयातील शोधप्रबंधांचे संदर्भ गोळा करण्यात आले. या पंचवीस वर्षांच्या कालावधीतील एकूण 257 शोध प्रबंधांचे अंशतः सादरीकरण करण्यात आले. प्रस्तुत शोधप्रकल्पामध्ये ग्रंथसूचीतील उल्लेखित ग्रंथांच्या लेखकानुसार माहितीचे विश्लेषण, भौगोलिक क्षेत्र आणि कालक्रमानुसार ग्रंथांची विभागणी करण्यात आलेली आहे.*

**प्रस्तावना (introduction).**

ज्ञानाचे संप्रेषण संदर्भाशिवाय होत नाही म्हणून प्रत्येक लेखक आपल्या लेखनात आवश्यक तेथे आशयाशी संबंधित असा (context) तयार करीत असतो. प्रबंध आणि शोधनिबंध यामध्ये संशोधकाने किंवा लेखकाने व्यक्त केलेल्या विचारांना आणि मतांना अगोदर निश्चित झालेल्या सिद्धांताचा आणि सूत्रांचा संदर्भ असतो. संशोधनात प्रयोजितलेल्या पद्धती आणि तंत्रे यांच्या समर्थनार्थ आणि उपयोगामध्ये अवलंबविलेली सूत्रे आणि वापरलेली ... आणि उपकरणे यामध्ये प्रत्येक लेखक त्याच्या आधीच्या लेखकांचा आधार घेत असतो. त्याचप्रमाणे आधीच्या लेखकांची मते खोडून काढण्यासाठी सुद्धा तो त्याचा उल्लेख आपल्या लेखनात करीत असतो. लेखातील अशा ... उल्लेखांची लेखाच्या शेवटी संदर्भसूची दिलेली असते. ते सर्व उल्लेख असतात त्यांनाच इंग्रजीमध्ये सायटेशन (citation) असे म्हणतात.

...लेख म्हणजे एखाद्या विशिष्ट विषयात पूर्वी माडले गेलेले मत उदधृत करणे आणि अशा विशिष्ट विषयातील निराळ्या प्रलेखातील उल्लेखांचा संख्यात्मक अभ्यास करणे म्हणजे उल्लेख विश्लेषण होय.

**...ष्टे (objectives).**

1. 1997 ते 2021 या 25 वर्षांमध्ये सादर शोध प्रबंधातील ग्रंथ सूची मध्ये उल्लेखित साधनांची माहिती घेणे.
2. कालक्रमानुसार शोधप्रबंधांतील उल्लेखित ग्रंथांची व इतर माहिती साधनाची विभागणी करणे.

**...धन पद्धती (research methodology)**

प्रस्तुत शोधप्रकल्पासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला असून एकूण 257 शोध ...ंचे विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये संशोधकाचे नाव, मार्गदर्शकाचे नाव व उल्लेख इत्यादींचा प्राथमिक ...वर माहिती कॅटलॉग कार्डवर लिहून विश्लेषण करण्यात आले आहे.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Assistant Professor
Shivaji College, Hingoli
Dist.Hingoli

165

IMPACT FACTOR 5.473(SJIF) | UPA NATIONAL E-JOURNAL Interdisciplinary Peer-Reviewed Journal | ISSN 2455-4375

माहितीचे विश्लेषण (Data Analysis)

प्रस्तुत शोधप्रकल्पामध्ये सन 1997 ते 2021 या 25 वर्षांच्या कालावधीतील एकूण 257 शोध प्रबंधांच्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**शोध प्रबंधांतील ग्रंथ सूची मध्ये उल्लेखित साधनांच्या माहितीचे विश्लेषण.**

शोधप्रबंधातील ग्रंथसूचीमध्ये उल्लेखित साधनांच्या माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे आहे.

**तक्ता क्र. 1**

**शोध प्रबंधातील ग्रंथसूचीमध्ये उलेखीत साधनांच्या माहितीचे विश्लेषण**

| क्र. | साधनांची नावे | उल्लेखित संख्या | टक्केवारी | एकत्रित संख्या | एकत्रित टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | ग्रंथ Marathi 23609 | | | | |
| | ग्रंथ Hindi 487 | | | | |
| | ग्रंथ English 290 | 24386 | 85.36 | 24386 | 85.36 |
| 2 | संदर्भ ग्रंथ | 1001 | 3.504 | 25387 | 88.87 |
| 3 | अप्रकाशित साहित्य/ प्रबंध/ग्रंथ | 125 | 0.438 | 25512 | 89.31 |
| 4 | स्मरणिका/गौरव ग्रंथ/विशेषांक | 139 | 0.487 | 25651 | 89.79 |
| 5 | नियतकालिके | 2065 | 7.229 | 27716 | 97.02 |
| 6 | वर्तमानपत्रे | 616 | 2.156 | 28332 | 99.18 |
| 7 | इतर साहित्य (11) | 235 | 0.823 | **28567** | **100** |
| | एकूण | **28567** | | | |

तक्ता क्र. 1 मध्ये सन 1997 ते 2021 या 25 वर्षांच्या कालावधीतील मराठी शोध प्रबंधात एकूण 17 साधनांचा वापर करण्यात आला असून उल्लेखांची एकूण संख्या 28567 आहे.

- उल्लेखित साधनांमध्ये ग्रंथाचे उल्लेख सर्वात जास्त 24386 आहे.
- उल्लेखीत नियतकालिकातील उल्लेखाची संख्या 2065 असून दुसऱ्या स्थानी आहे.
- उल्लेखित संदर्भ ग्रंथातील उल्लेखांची संख्या 1001 आहे.

इतर (11) साहित्याचे विश्लेषण खालील प्रमाणे.

**तक्ता क्र. 2**

**इतर साहित्याचे विश्लेषण**

| अ.क्र. | इतर साहित्याचे नाव | उल्लेखित संख्या |
|---|---|---|
| 1 | सेमिनार | 22 |



PRINCIPAL Shivaji College Hingoli.Dist.Hingoli
Assistant Professor Shivaji College, Hingoli Dist. Hingoli (M.S.)
166


| | | |
|---|---|---|
| 2 | चर्चासत्र | 4 |
| 3 | पत्रे | 2 |
| 4 | भाषणे | 41 |
| 5 | लेख | 18 |
| 6 | ध्वनिफीत | 20 |
| 7 | अहवाल (report) | 23 |
| 8 | कॅसेट (CD) | 4 |
| 9 | गॅझेट | 9 |
| 10 | आकाशवाणी | 2 |
| 11 | संकेतस्थळ (website) | 91 |
| | **एकूण** | **236** |

तक्ता क्र. 2 मध्ये उल्लेखित इतर साधनांमध्ये सर्वात जास्त (41) भाषणे आहेत.

तक्ता क्र. 2 चे आलेखीय रूपांतर खालील प्रमाणे.

**आलेख क्र. 1.**

**उल्लेखित माहिती साधने**




शोधप्रबंधांतील ग्रंथ सूचीमध्ये उल्लेखित ग्रंथांच्या लेखकानुसार माहितीचे विश्लेषण.(Authorship Pattern)

मराठी विषयामध्ये सादर शोधप्रबंधांतील ग्रंथसूचीमध्ये लेखीत लेखकानुसार माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे.

**तक्ता क्र. 3**

**लेखकानुसार माहितीचे विश्लेषण**

| अ.क्र. | लेखक | संख्या | टक्केवारी | एकत्रित संख्या | एकत्रित टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | एक लेखक | 22025 | 96.314 | 22025 | 96.314 |
| 2 | दोन लेखक | 784 | 3.4284 | 22809 | 99.742 |



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Shivaji College Hingoli Dist Hingoli

167


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | तीन व त्यापेक्षा जास्त लेखक | 59 | 0.258 | 22868 | 100 |
| | एकूण | **22868** | **100** | | |

➢ एका लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांचे उल्लेख सर्वात जास्त एकूण 22025 आहे.

➢ 59 उल्लेखित ग्रंथांवर तीन व त्यापेक्षा जास्त लेखकांच्या नावाचा उल्लेख आहे.

**आलेख क्र. 2.**

**शोध प्रबंधातील ग्रंथ सूचीमध्ये उल्लेखित ग्रंथांच्या लेखकानुसार माहितीचा आलेख**




**तक्ता क्र. 3**

**उल्लेखित ग्रंथाच्या कालक्रमानुसार माहितीचे विश्लेषण.**

| अ.क्र. | कालक्रम | मराठी ग्रंथ | हिंदी ग्रंथ | इंग्रजी ग्रंथ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रारंभ ते 1900 | 37 | 1 | 3 | **41** |
| 2 | 1901-10 | 16 | 0 | 3 | **19** |
| 3 | 1911-20 | 34 | 1 | 8 | **43** |
| 4 | 1921-30 | 64 | 0 | 9 | **73** |
| 5 | 1931-40 | 116 | 0 | 3 | **119** |
| 6 | 1941-50 | 148 | 1 | 27 | **176** |
| 7 | 1951-60 | 590 | 11 | 26 | **627** |
| 8 | 1961-70 | 1181 | 27 | 31 | **1239** |
| 9 | 1971-80 | 1983 | 57 | 36 | **2076** |
| 10 | 1981-90 | 3213 | 68 | 23 | **3304** |
| 11 | 1991-00 | 5310 | 93 | 16 | **5419** |
| 12 | 2001-10 | 6049 | 106 | 7 | **6162** |
| 13 | 2011-20 | 1526 | 41 | 2 | **1569** |
| 14 | 2021ते त्यापुढे | 5 | 0 | 0 | **5** |
| 15 | वर्षाचा उल्लेख नाही | 3337 | 81 | 96 | **3514** |
| | एकूण | **23609** | **487** | **290** | **24386** |



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli


168

कालक्रमानुसार शोध प्रबंधातील ग्रंथांच्या उल्लेखाचे विश्लेषण तक्ता क्र. 4 मध्ये दर्शविलेली आहे या ग्रंथांमधील उल्लेखांना प्रत्येकी 10 वर्षाच्या कालमर्यादेनुसार 15 भागांमध्ये विभाजित करण्यात आले आहे.

- या विश्लेषणांमध्ये सर्वात जास्त उल्लेखित मराठी ग्रंथांची संख्या (23609) आहे.
- तर सर्वात कमी उल्लेखित इंग्रजी ग्रंथांची संख्या (290) आहे.
- कालक्रमानुसार 2001 ते 2010 मध्ये सर्वात जास्त उल्लेखित ग्रंथांची संख्या (6162) आहे.

**आलेख क्र. 3**

उल्ले खत ग्रंथाच्या कालक्रमानुसार माहितीचे वश्लेषण.




**निष्कर्ष :**

1. सन 1997 ते 2021 या 25 वर्षात 17 साधनांचा वापर करण्यात आला असून त्यात उल्लेखित साधनांची एकत्रित संख्या 28567 आहे.
2. उल्लेखित साधनांमध्ये ग्रंथांचा वापर सर्वात जास्त करण्यात आला आहे.
3. लेखीत ग्रंथांचे लेखकानुसार विश्लेषणांमध्ये सर्वात जास्त एका लेखकाने लिहिलेल्या ग्रंथांचा उल्लेख करण्यात आला आहे.
4. उल्लेखित ग्रंथाचे कालक्रमानुसार विश्लेषण करता सर्वात जास्त 2001 ते 2010 मध्ये प्रकाशित ग्रंथांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**संदर्भसूची :**


- कुंभार राजेंद्र (2013) ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती, युनिव्हर्सल प्रकाशन, पुणे.
- हेडाऊ मुरलीधर एस. व साखरकर शालिनी. रा. तु. म. नागपूर विद्यापीठात 1984 ते 2008 मध्ये सादर मराठी वाङ्मय शोधप्रबंधाचे उल्लेख विश्लेषण : एक अभ्यास.
- आठल्ये श्रीनिवास मेघ:शाम. मुंबई विद्यापीठात सादर केलेल्या मराठी भाषेतील प्रबंधांची उल्लेख विश्लेषण.
- धर्मापुरीकर रणजीत, उदहरण विश्लेषण, "ज्ञानगंगोत्री" शोधनिबंध (डीसें 2000. जाने – फेब्रु 2001.)




PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli
Assistant Professor
169